**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 06.02.2025** **वार- गुरुवार**

---

मुख्यमंत्री

उद्योगांना त्रास होईल अशी वर्तवणूक करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिला. पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं; त्यावेळी ते बोलत होते. पिंपरी चिंचवडच्या नवीन पोलीस आयुक्तालयाचं, तसंच पुणे पोलिस अधीक्षक कार्यालयाचं भूमीपूजनही यावेळी करण्यात आलं. पुणे जिल्हा औद्योगिक उत्पादनासाठी ओळखला जातो. त्यामुळे या जिल्ह्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण आवश्यक आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार या कार्यक्रमाला उपस्थित होते. आपल्या भाषणात पवार यांनी आयुक्तालयाच्या आराखड्याची माहिती दिली, तसंच पुरंदरमध्ये नवीन विमानतळ प्रस्तावित असल्याचंही नमूद केलं. पुणे आणि पिंपरी चिंचवडमधल्या अन्य काही कार्यक्रमांनाही मुख्यमंत्र्यांनी आज हजेरी लावली.

स्मार्टसिटी

स्मार्ट सिटी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक आज पुण्यात पार पडली. स्मार्ट सिटी कंपनीअंतर्गत पुण्यात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांसाठी पुणे महापालिकेने

40 कोटी रुपयांचा निधी द्यावा, अशी मागणी कंपनीने केली आहे. केंद्राचं अनुदान मिळाल्यानंतर व्याजासह हा निधी परत केला जाईल, असा प्रस्तावही कंपनीने ठेवला आहे. दरम्यान पुणे शहरातील स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत 'एटीएमएस' योजनेतील 125 चौकातील सिग्नल व्यवस्थेचं नियंत्रण वाहतूक पोलिसांनी आपल्याकडे मागितलं आहे. शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक सिग्नल यंत्रणा पोलिसांकडे हस्तांतरित करावी, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच घेतलेल्या वाहतूक आढावा बैठकीत केली होती. सध्या या योजनेचा तसंच देखभाल दुरुस्तीचा खर्च पुणे महापालिका करत आहे.

पुणे जीबीएस

पुण्यात जीबीएसच्या संशयित रुग्णांची संख्या 170 झाली असून, 132 जणांना या आजाराचं निदान झालं आहे. या आजारमुळे आतापर्यंत 5 जणांचा मृत्यू झाला आहे. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, पुणे महानगरपालिका क्षेत्रात 33, पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट केलेल्या गावांच्या हद्दीत 86, पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत 22, पुण्याच्या ग्रामीण भागामध्ये 21 आणि इतर जिल्ह्यांमध्ये 8जीबीएस बाधित रुग्ण आढळून आले आहेत. जीबीएसच्या 62 रुग्णांना उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं असून 20 जण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. दरम्यान, दूषित पण्यामुळेच जीबीएस आजार होत असल्याचा अहवाल एनआयव्हीने दिला आहे. जीबीएसच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, एनआयव्ही आणि राज्य सरकारच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची  महापालिकेत संयुक्त बैठक झाली. या बैठकीत एनआयव्हीच्या अधिकाऱ्यांनी पाहणी अहवाल सादर केल्याचं महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त बी. पी. पृथ्वीराज यांनी सांगितलं.

विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्तानं आयोजित केलेल्या विज्ञान धारा या विज्ञान एकांकिका स्पर्धेचं उद्घाटन ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक, अभिनेते आणि ललित कला केंद्राचे संस्थापक सतीश आळेकर यांच्या हस्ते नुकतंच झालं. रोजच्या आयुष्यात वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला यावेळी आळेकर यांनी मुलांना दिला. या स्पर्धेमध्ये अनेक शैक्षणिक प्रशाला आणि संस्थांचे इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

अमलीपदार्थ

अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोघांना पुणे पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने नुकतंच सिंहगड कॉलेज परिसरातून पकडलं. त्यांच्याकडून 4 किलो अमली पदार्थ हस्तगत करण्यात आले आहेत. हे दोघेही मूळचे धुळे जिल्ह्यातील आहेत.

कुस्ती

हिंदू गर्जना चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा पुण्यात उद्यापासून 9 फेब्रुवारीपर्यंत रंगणार आहेत. स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर, पुरुष आणि महिला खुल्या गटात तसंच पुणे शहर आणि जिल्हा अशा गटात या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर मातीचे दोन स्वतंत्र आखाडे तयार करण्यात आले असून एकंदर 45 लाख रुपयांची विविध बक्षिसं दिली जाणार आहेत.

## क्रीडा

महाराष्ट्रीय मंडळाच्यावतीने आयोजित आंतर-शालेय मैदानी स्पर्धेत मुक्तांगण इंग्लिश मिडीयम स्कूल संघाने 48 गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं. तर, टिळक रस्त्यावरील महाराष्ट्रीय मंडळ इंग्लिश मिडियम स्कूलच्या संघाने 30 गुणांसह उपविजेतेपद मिळवलं. स्पर्धेत 52 पेक्षा अधिक शाळांमधील 950 हून अधिक खेळाडूंना भाग घेतला होता.

## गिर्यारोहण

चढाईसाठी अत्यंत कठीण असलेला सह्याद्रीच्या खोऱ्यातला मोरोशीचा भैरवगड पुण्यातील एडव्हेंचर जंक्शनच्या गिर्यारोहकांनी नुकताच सर केला. मानसिंह चव्हाण, कृष्णा मरगळे, लोकेश नाईलकर आणि अनंता कोकरे या चौघांनी ही मोहीम फत्ते केली. गड सर करून गडावर भगवं निशाण फडकावत त्यांनी छत्रपती शिवरायांना अभिवादन केलं. माळशेज घाट उतरल्यावर ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील मोरोशी गावच्या दक्षिणेला हा अजस्त्र असा भैरावगड आहे. पूर्व पश्चिम पसरलेल्या या गडाची उंची सुमारे 450 फुट आहे.

## हवामान

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान 33 अंश तर किमान तापमान 15 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि आकाश निरभ्र राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.